जा.क्र.मनपा/साप्रवि(आस्था-1)/2025/506
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक -26/03/2025.

<u>कार्यालयीन आदेश</u> –

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील क्रिडा विभागातील कार्यरत कंत्राटी कर्मचा-याने मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता करुन शासकीय रकमेचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे. महानगरपालिकेतील विविध कार्यालयात संबंधित विभागाच्या विभाग प्रमुख/शाखा प्रमुख यांनी बाह्यस्त्रोत/कंत्राटी तत्वावर नियुक्त कर्मचा-यांना कार्यालयीन कामकाज नेमून देतांना महानगरपालिकेला देय असलेली रक्कम स्विकारण्याचे व रोख रक्कम हाताळण्याचे कामकाज/जबाबदारी सोपविण्यात आल्याचे दिसून आलेले आहे. सदर बाब ही योग्य नाही.

करिता याद्वारे सर्व विभाग प्रमुख/शाखा प्रमुख यांना आदेशीत करण्यात येते की, बाह्यस्त्रोत/कंत्राटी तत्वावर नियुक्त कर्मचा-यांना महानगरपालिकेला देय असलेली रक्कम स्विकारण्याचे व रोख रक्कम हाताळण्याचे कामकाज/जबाबदारी सोपविण्यात येवू नये. तसेच सदर कामे संबंधितांकडे सोपविण्यात आलेले असल्यास तात्काळ कायमस्वरुपी कर्मचा-याकडे सोपविण्यात यावे. तसेच पर्यायी मनुष्यबळ अथवा समकक्ष पदाचा कर्मचारी उपलब्ध नसल्यास इतर पदावरील रक्कम हाताळण्याबाबतच्या कामाची माहिती असलेल्या कायमस्वरुपी कर्मचा-यामार्फत सदरचे काम करुन घेण्यात यावे.

तसेच भविष्यात उक्त कामासाठी बाह्यस्त्रोत/कंत्राटी तत्वावर कर्मचा-यांना कामकाज/जबाबदारी सोपविल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित विभाग प्रमुख व शाखा प्रमुख यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करुन फौजदारी स्वरुपाचा गुन्हा नोंद करण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

<u>प्रत</u> –

1) सर्व विभाग प्रमुख/शाखा प्रमुख
2) संबंधितास
3) आदेश संचिका